ePaper
उदयनराजे भोसले यांच्यासह 50 जणांविरोधात गुन्हा दाखल



| वर्ष - 7 । अंक -56 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- बोऱ्हाडेवाडी महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वप्नातील शाळा सत्यात उतरली!
- सेवा, सुशासन व गरीब कल्याणासाठी भाजपाचे महा-जनसंपर्क अभियान

www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 22 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा पॉवर प्ले : 82 दिवसांत 300 कोटी पार

# करसंकलन विभाग ॲक्शन मोडवर!

### » निव्वळ ऑनलाइन भरणा सव्वादोनशे कोटी

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने सध्या करवसुलीबाबत ॲक्शन मोडचा पवित्रा स्वीकारला आहे. गतवर्षीची जप्ती कारवाई, करदात्यांना कर भरण्यासाठी आवाहन करण्याचे नावीन्यपूर्ण मार्ग, यातून करदात्यांची मानसिकता बदलविण्यात विभागाला यश आले आहे. त्याचाच परिणाम म्हणून 82 दिवसांच्या विक्रमी वेळेत तब्बल 300 कोटींचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. यात 40 टक्के मालमत्ताधारकांनी आजपर्यंत आपला संपूर्ण कर जमा केलेला आहे.**




शहरामध्ये आजमितीस 6,02,203 विविध प्रकारच्या मालमत्ता आहेत. महापालिकेच्या माध्यमातून चालूवर्षी 100 टक्के बिलांचे वाटप झाल्याने करवसुलीमध्ये सकारात्मक परिणाम झालेला आहे. विभागाच्या माध्यमातून सध्या 30 जूनपर्यंत असणाऱ्या मालमत्ताकरामधील सवलतींबाबत विविध माध्यमातून जनजागृती मोहीम राबविली जात आहे. यामध्ये एसएमएस, टेलिकॉलिंग, आय.व्ही. आर.एस. कॉलिंग, रील्स स्पर्धा, होर्डिंग्ज, पॉम्प्लेट, रिक्षाद्वारे आवाहन आदी मार्फत शहरामध्ये जनजागृती सुरू आहे.

**300 कोटी; पाच वर्षांचा दृष्टिक्षेप..**

मागील पाच वर्षांच्या तुलनेत चालू वर्षी विभागाने विक्रमी वेळेमध्ये तब्बल 300 कोटींचे करसंकलन केले आहे. 1 एप्रिल ते 30 जून हे सर्वाधिक कर भरण्याचे दिवस म्हणजे एक प्रकारे पॉवर प्ले असतो. पण यात विभागापेक्षा कर्तव्यदक्ष, जागरूक जबाबदार करदाते यांचा सिंहाचा वाटा आहे. पालिकेने राबवलेल्या जनजागृती उपक्रम आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याला या नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यानेच हे शक्य झाले आहे. त्यामुळे त्यांचे शतशः आभार. उर्वरित करदात्यांनी सुद्धा 30 जूनपर्यंत आपल्या कराचा भरणा करावा, असे आवाहन कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त, नीलेश देशमुख यांनी केले आहे.

### निव्वळ ऑनलाइन भरणा सव्वादोनशे कोटी..

» महापालिकेने मालमत्ताकरामध्ये आगाऊ कर भरल्यास 5 टक्के व ऑनलाइन कराचा भरणा केल्यास 5 टक्क्यांची सवलत असल्याने करदात्यांनी मोठ्या प्रमाणात सवलतींचा लाभ घेतला आहे. त्याचा परिणाम म्हणून ऑनलाइन स्वरूपात तब्बल सव्वाशे कोटींचा भरणा झाला असून, पेपरलेस व डिजिटल इंडिया अभियानास या सवलतींच्या उपक्रमाद्वारे चालना मिळालेली आहे.



“ येत्यागतवर्षीची जप्ती कारवाई, प्रकल्प सिद्धी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, यामुळे या वर्षी करसंकलनात पालिकेने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली आहे. ही आघाडी वर्षभर कायम राहील, अशी दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत. आता होऊ घातलेल्या मालमत्ता सर्वेक्षणातून पालिकेची करप्रणाली अत्यंत पारदर्शी, लोकाभिमुख आणि समन्यायी ठरेल, अशी अपेक्षा आहे. सर्वेक्षणाला सर्व नागरिकांनी सहकार्य करावे. – **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

---

# पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकचे काम मार्गी लागणार

### » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मान्यता; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठीचा राज्य सरकारचा हिस्सा लवकर देण्यात येईल. हा प्रकल्प केंद्र, राज्य शासनाच्या महारेल कंपनीच्या माध्यमातून हाती घेवून पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील.**



त्यासाठी लवकरच केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत बैठक घेतली जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकच्या कामाला गती मिळेल असा विश्वास मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला. खासदार बारणे यांनी गेले तीन वर्ष सातत्याने पाठपुरावा करुन पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. कामाला गती देण्यासाठी राज्य सरकार, रेल्वे, महारेलच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. एमआरव्हीसीचे सीएमडी सुभाष गुप्ता, विलास वाडेकर, बी.के.झा, रुता चिम्सन, रेल्वेचे सुरेश पाखरे आदी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, केंद्र सरकारने 2014-15 मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. त्यासाठी 2017 मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली. परंतु, डीपीआर तयार करताना त्याचा खर्च 2100 कोटी होता.




# विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल व विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जागतिक योग दिवस व जागतिक संगीत दिन उत्साहात साजरा!

**।चाकण। महाईन्यूज ।।प्रतिनिधी।**

**जागतिक योग दिवस व जागतिक संगीत दिनानिमित्त विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल व विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. राजाराम बोरकर व त्यांच्या शिष्या सौ. सुजाता गव्हाणे व गोकुळ गोरे उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी अकरा सूर्यनमस्कार पारंपारिक पद्धतीने केले. तसेच श्री. राजाराम बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आसनांची प्रात्यक्षिके झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे त्यांच्याबरोबर आसने केली व त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने माहिती घेतली. प्राणायाम , मेडिटेशन व ओंकाराची प्रात्यक्षिके झाली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक काव्यांचे व सुमधुर वाद्यांचे सादरीकरण केले. प्रमुख अतिथी सुजाता गव्हाणे यांनी योगाभ्यासाचे व तणावमुक्त जीवनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. स्वाती रणदिवे यांनी सकारात्मक ऊर्जा, एकाग्रता व कार्यक्षम ऊर्जा कशी वाढते याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूलचे प्रिन्सिपल श्री. दीपक शिंदे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. संस्थेच्या सेक्रेटरी व CEO रोहिणीताई देशमुख यांनी उपस्थिती दाखवून योगाभ्यासाचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीता नायकवाडी व माधुरी लोंढे यांनी केले. योग दिनाचे महत्त्व मोनाली शिंदे यांनी तर संगीत दिनाचे महत्त्व नयन बालसराफ यांनी सांगितले.

श्री सोमनाथ हातुरे यांनी आभार प्रदर्शन केले. अतिशय आनंदी व उत्साही वातावरणात कार्यक्रम पार पडला.

# चाकण येथील ऑटर कंट्रोल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा!

## कंपनीच्या संचालकांनी सर्व कर्मचाऱ्यांना योगाचे महत्व व फायदे समजावून सांगितले

**।चाकण (खराबवाडी) ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चाकण (खराबवाडी) येथील यू टर्न इंडस्ट्रिअल इस्टेट, एमआईडीसी येथील ऑटर कंट्रोल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये सालाबादप्रमाणे या वर्षीही मोठ्या जल्लोषात योगदिवस (21 जून) साजरा करण्यात आला. योगदिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिने कलाकार राहुल जोशी यांची उपस्थित होती.**

यावेळी यावेळी ऑटर कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी (CFO) गौरव जैन, प्लांट हेड, गणेश मुळे व इतर कर्मचाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. कंपनीचे संचालक उल्हास जोशी आणि त्यांच्या पत्नी गायत्री जोशी यांनी सर्व कर्मचाऱ्यांना योगाचे महत्व व फायदे समजावून सांगितले. तसेच



त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून योग्यरित्या योग करवून घेतला. तसेच ऑटर कंपनीमध्ये "दिवसाची सुरुवात योगाने" या संकल्पनेतून मागील वर्षाच्या योग दिनापासून कंपनीमध्ये नियमित योग उपासना केली जाते.

### कर्मचाऱ्यांनी पूर्ण केले सूर्यनमस्कार

- ऑटर कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांनी एप्रिल 2022 ते जून 2022 या कालावधीमध्ये 1 लाख 51 हजार 251 सूर्यनमस्कार केले होते आणि तसाच हा उपक्रम यावर्षीही राबवण्यात आला असून सर्व कर्मचाऱ्यांनी मिळून 3 लाख 16 हजार 671 सूर्यनमस्कार पूर्ण केले.
- कंपनीच्या एकूण 230 कर्मचाऱ्यांनी आणि त्यात 30 महीला कर्मचाऱ्यांनीही सहभाग नोंदविला. तसेच कंपनीच्या परिसरातील बहुतेक कंपन्यांमध्ये उल्हास जोशी यांच्या मार्गदर्शनातून योगाची जागृती करून त्यांनाही प्रोत्साहित केले आणि तेही या उपक्रमात सहभागी झाले.

# बोऱ्हाडेवाडी महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वप्नातील शाळा सत्यात उतरली!

## परिसरातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून व्यक्त होतेय समाधान





### आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बोऱ्हाडेवाडी परिसरातील विद्यार्थींना अखेर हक्काची शाळा मिळाली आहे. अनेक वर्षांपासून जुन्या धोकादायक शाळेच्या इमारतीत आणि पत्राशेडमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी यंदा सुसज्ज आणि प्रशस्त शाळेत दाखल झाले आहेत. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात झाला. याबाबत "विद्यार्थ्यांच्या स्वप्नातील शाळा सत्यात उतरली.." अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या आहेत.**

बोऱ्हाडेवाडी येथील कै.महादू श्रीपती सस्ते मुले - मुलींची शाळा क्रमांक-१३ या महापालिका शाळेच्या इमारतीचे काम गेल्या प्रलंबित होते. इमारतीअभावी येथील विद्यार्थ्यांची परवड होत होती. याबाबत माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे आणि सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला. त्याला आमदार महेश लांडगे यांची साथ मिळाली आणि शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन झाले. इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते इमारतीचे उद्घाटन झाले. आता आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा नवीन शैक्षणिक वर्षात आणि नव्या इमारतीमध्ये स्वागत समारंभही झाला. त्यामुळे पालक आणि शिक्षकांसह विद्यार्थी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

नूतन इमारतीमध्ये शाळा दि. २१ जूनपासून शाळा सुरु झाली. चिमुकल्यांचा स्वागतोत्सव यावेळी साजरा करण्यात आला. रांगोळीच्या पायघड्या, रंगबेरंगी फुगे, फुलांची सजावट करत, विद्यार्थ्यांचे औक्षण करत उत्साह साजरा करण्यात आला. शाळेच्या स्वागतोत्सव कार्यक्रमास आमदार महेश लांडगे, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता देवन्ना गट्टुवार, उपअभियंता नरेश जाधव, कनिष्ठ अभियंता अनिल गडदे,संभाजी बोऱ्हाडे, नवनाथ बोऱ्हाडे, संजय सस्ते, बाळू सस्ते, विश्वास जैद,अशोक बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद उपस्थित होते.

> **"बोऱ्हाडेवाडी आणि परिसरातील सर्वसामान्य विद्यार्थींना शिक्षणाची सुविधा निर्माण झाली. शाळेच्या नवीन इमारतीमध्ये प्रशस्त वर्ग खोल्या, मुख्याध्यापक, शिक्षक कक्ष, प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृह, सभागृह, प्रयोगशाळा, वाचनालय, भांडारगृह, प्रशस्त पार्किंग व खेळण्यासाठी ग्राउंड उपलब्ध झाले आहे. समाविष्ट गावांतील विकासकामांच्या 'बकेट लिस्ट'मधील आणख एक संकल्प पूर्ण झाल्याचे समाधान आहे. केवळ कामांची घोषणा नाही, तर भूमिपूजन आणि उद्घाटनसुद्धा आमच्या हातूनच होईल, अशी गतीमान कार्यपद्धती आम्ही कायम ठेवली आहे.**
>
> **- महेश लांडगे,**
> **शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### दहावीपर्यंतचे शिक्षण एकाच छताखाली...

**माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे म्हणाल्या की, बोऱ्हाडेवाडीतील शाळेत वाडी व वस्त्यांवरील,संजय गांधी नगर मधील गरीब व मध्यम वर्गीय कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे फक्त पहिली ते आठवी पर्यंतच वर्ग सुरु होते. त्यामुळे नागरिकांना आपल्या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी खाजगी शाळेत जावे लागत होते. खाजगी शाळा व त्याच्या अवाजवी खर्च हा या कुटूंबाना न पेलवणारा होता. यामुळे गेले अनेक वर्षांपासून येथील पालिकेच्या शाळेत पहिली ते दहावी पर्यंतचे वर्ग सुरु करण्याची मागणी करण्यात येत होती. आमदार महेश दादा यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची नवीन इमारत आणि दहावीपर्यंतचे वर्ग सुरु करण्यात आले. त्यामुळे माझ्या परिसरातील विद्यार्थ्यांना पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण एकाच छताखाली होणार असल्याने पालक निश्चिंत झाले आहेत.**

---

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निर्णयामुळे जगाला निरोगी आरोग्याचा संदेश!

## आमदार महेश लांडगे यांची भावना; पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात

। पिंपरी । महाईन्यूज

**देशाचे पंतप्रधान नरेंद्रमोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची घोषणा करून संपूर्ण जगाला निरोगी आरोग्याचा संदेश दिला आहे. जगभरात योग दिवस साजरा होत असून, पिंपरी-चिंचवडकरांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे. नव्या पिढीला योगाचे महत्व पटवून दिले पाहिजे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**

पिंपरी- चिंचवड भाजपातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विधानसभा मतदार संघनिहाय योग आणि मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. पतंजली योगपीठच्या सहकार्याने भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत इंद्रायणीनगर येथील सी-सर्कल येथे योगा शिबीर झाले.

यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, भाजपा कामगार आघाडीचे हनुमंत लांडगे, उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष निखिल काळकुटे, भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष शिवराज लांडगे आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करुन शिबिराला सुरूवात करण्यात आली. तसेच, उद्योजक प्रताप मोहीते, सुरेंद्र वाधवा, सदाशीव बोराटे, मोहनराज कुलकर्णी, उद्योजिका सुनीता पाटसकर, माणिक पडवळ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# ईश्वर भक्ती आणि तर्क!




**जगात सर्वत्र देव,गॉड किंवा अल्लाह मानणारे खूपमोठे समुदाय आहेत. हे जग कसे निर्माण झाले याची माहिती नव्हती त्या काळात जेवढे लोक श्रद्धावान होते त्याहीपेक्षा हे ज्ञान मिळाल्यावर लोक वाढले आहेत. पृथ्वी, ग्रह,तारे ,सूर्य आणि चंद्र कसे निर्माण झाले याची माहिती आजचे विज्ञान मानवाला देत असले तरी कुणीतरी या सृष्टीचा निर्माता आणि नियंता असला पाहिजे असे मानणारे लोक आहेत. काही वर्षांपूर्वी बिग बँग प्रयोग झाला त्यातून ब्रह्माण्ड निर्मितीचे गूढ उकलले गेले असले तरी श्रद्धावान लोकांचा त्यावर भरवसा बसत नाही.**

विज्ञानाच्या क्षेत्रात झालेले अनेक प्रयोग अश्या लोकांना मान्य नसतात,त्याला इलाज नाही. धर्मग्रंथातून निर्माण झालेल्या श्रद्धा ते मान्य करण्याची परवानगी देत नाहीत. नवी संशोधने मान्य केली तर मग श्रद्धेच्या ठिकऱ्या उडतात. धर्मग्रंथ आणि ज्यांच्यावर श्रद्धा ठेवली ते खोटे ठरण्याची भीती असते म्हणून आजचे विज्ञान कितीही सत्य सांगत असले तरी धर्म अनुयायी ते मान्य करीत नाहीत.



कुणीतरी हे जग निर्माण केले असावे असे जगातील ८० टक्के लोकांना वाटते. आधी हे प्रमाण कदाचित शंभर टक्के असण्याची शक्यता आहे कारण तोवर विविध क्षेत्रात संशोधने झाली नव्हती. शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवला जात नव्हता , बाराव्या शतकानंतर त्याला अधिक महत्व जगभरात देण्यात आल्यामुळे अनेक पिढ्या विविध क्षेत्रात संशोधने करायला लागल्या. त्यातून आजचे प्रगत विज्ञान आपल्याला उपलब्ध झाले आहे. खगोलशास्त्र,पुरातत्व,शरीर विज्ञान ,अंतराळ शास्त्र अशी असंख्य अंगे तयार होऊन त्यांनी जगभरात कोट्यवधी अभ्यासक तयार केले त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा जगातील संपूर्ण मानव जातीला व्हायला लागला. वर्तमानात जगाने त्यात जी उंच भरारी घेतली आहे त्याने आपले डोळे दिपून जातात. जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या रोजच्या व्यवहारात वापरली जाईल तेव्हा सगळ्यांचे डोळे विस्फारले जातील.

श्रद्धावान वर्गाने मात्र काहीही झाले तरी ग्रंथ किंवा शब्द प्रामाण्य सोडायचे नाही असे ठरवले आहे. जगभरात गॉड,अल्लाह याना मानणारे आणि भारतात देवाला मानणारे लोक विज्ञानाने विकसित केलेल्या सुविधांचा मुबलक वापर करतात मात्र आपल्या सुपर पावरची भक्तीही करताना दिसतात. देव सगळ्यांवर लक्ष ठेवतो तो कुणावरही अन्याय होऊ देत नाही अशी श्रद्धा असणाऱ्या लोकांच्या देवाने पाकिस्तानात अल्पसंख्य हिंदूंना कधीच मदत केल्याचे दिसले नाही आणि अल्लाह चीनमधील विगर मुस्लिमांच्या मदतीला कधी धावला नाही. चीनमधील दीडदोन कोटी विगर मुस्लिमांवर गेली दोन दशके अमानुष अत्याचार होत असताना जगातील ५६ मुस्लिम देशात त्याचे प्रतिबिंब उमटत नाही उलट अनेक मुस्लिम देश चीनसोबत विविध व्यापार करार करताना दिसतात. या घडामोडींची श्रद्धावान मुस्लिमांचे डोळे उघडत नाहीत किंवा त्यावरून कुणाचे इमानही डळमळीत होताना दिसत नाही.

भक्ती कुणाचीही करा त्याची पहिली अट ही असते की तर्क करायचा नाही. तर्क,संदेह किंवा प्रश्न पडता कामा नये असे धर्माचे निकष पाळणारे अनुयायी कालांतराने सवयीचे गुलाम होतात आणि नंतर त्यांनी कितीही शिक्षण घेतले तरी त्यांच्या डोक्यात धर्म आणि धर्मग्रन्थाबाबत शंका निर्माण होत नाहीत. ज्यांनी मेंदूतील तर्काचा कप्पा वापरणे बंद केले की त्या कप्प्यात कधीच संशयाचे,प्रश्नांचे तरंग उठत नाहीत त्यामुळे जे काही होतेय ते देवाच्या .अल्लाहच्या मर्जीने होतेय असे अनुयायी मानत असतात. ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मात मरणानंतरच्या जीवनाला अतिशय महत्व दिले गेले आहे कारण त्याचे उल्लेख या दोघांच्याही धर्मग्रंथात आहेत. जे त्यात लिहिले आहे त्यातील प्रत्येक शब्द खरा असल्याचे या दोन्ही धर्मात मानले जाते. हे शब्दप्रामाण्य स्वीकारणे या दोन्ही धर्मातील विवेकी लोकांना त्रासदायक असते. ज्यांच्या शंका,प्रश्न वाढत जातात त्यांचा प्रवास नास्तिकतेच्या दिशेला सुरू होतो.

तर्क आणि भक्ती किंवा श्रद्धा ह्या परस्पर विरोधी प्रक्रिया आहेत,दोन्ही एकत्र नंदू शकत नाहीत. जे लोक अध्यात्म आणि विज्ञान यांचा मेळ घालत जगण्याचा प्रयत्न करतात ते स्वतःसोबत समाजाची फसवणूक करीत असतात.विज्ञान जिथे संपते तेथून अध्यात्म सुरु होते ही लोकप्रियिय फोकनाड अध्यात्म क्षेत्रातील लोक अनेकदा मारीत असतात , त्याला कोणताही आधार नसतो, कारण विज्ञान हा काही आखलेला मार्ग नाही ती विचार प्रक्रिया आहे ,तिचा संबंध आपल्या मेंदूत निर्माण होणाऱ्या प्रश्नांशी असतो. आजच्या काळात सगळ्याच धर्म ग्रंथांमधील कथित ज्ञान ज्याला कळले त्याने धर्म सोडायला सुरुवात केल्याचे जाणवत आहे. हिंदूंना हा प्रश्ननसतो कारण या नावाचा कोणताही धर्म वेद ,पुराणे,उपनिषद किंवा शास्त्रात दिसत नाही आणि कुणी धर्म ग्रंथांमधील शब्दांवर शंभर टक्के विश्वासही ठेवत नाही. काही अप्रिय बाबी असतील तर त्या आता कालबाह्य झाल्याचे मान्य करून हिंदू पुढे जात आला आहे.

## संपादकीय »

### सुंदोपसुंदीचा नवा अध्याय!


***महाराष्ट्रातील जनतेची सेवा करण्यासाठी दोन्ही शिवसेना जी परस्पर स्पर्धा करीत आहेत; तिने नवनवे टप्पे गाठले आहेत. मुंबई महापालिकेत गैरप्रकार झाल्याचा जो अहवाल 'कॅग'ने दिला आहे; त्या अहवालाला अनुसरून राज्य सरकार एकीकडे चौकशी करणार आहे...***

दुसरीकडे शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट येत्या एक जुलैला मुंबई महापालिकेतील सध्याच्या भ्रष्टाचार आणि लुटीच्या विरोधात महापालिकेवरच महामोर्चा काढणार आहे. 'भ्रष्टाचाराशी लढा' हाच दोन्ही शिवसेना पक्षांचा एकच उदात्त हेतू असताना त्यांच्यात फूट तरी का पडावी, असा बाळबोध प्रश्न कोणत्याही सामान्य नागरिकाला पडेल. मात्र, शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने जे दोन महामेळावे मुंबईत झाले; ते झाल्यानंतरही उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे काही बोलत आहेत, ते सगळे पाहता एका वर्षापूर्वी जे काही घडले त्यातून महाराष्ट्राची राजकीय चर्चा कधी बाहेर येणार, हाच प्रश्न पुन्हा एकदा उभा राहिला आहे. खोके, गद्दार, फितुरी, बापाची चोरी, इतिहासातले कोणतेतरी खान आणि महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याची आवई या साऱ्यातून राजकीय चर्चा बाहेर यायला हवी.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याला खास पार्श्वभूमी आहे. गलवान खोऱ्यात भारतीय सैनिकांनी सन २०२० मध्ये जो भीमपराक्रम केला त्याचा तिसरा स्मृतिदिन येत आहे. जवानांची मर्दुमकी आणि यामुळे प्रकटलेली रणनीती अमेरिकेच्या पाठबळामुळे भविष्यात अधिक यशस्वी होईल अशी चिन्हे आहेत.**

## भारताला अमेरिकेचे पाठबळ!

सन २०२०च्या १५ जूनला गलवान खोऱ्यात आपल्या शूर सैनिकांनी मल्लयुद्ध खेळून चाळीस चिन्यांना यमसदनी पाठवले. आपलेही वीस सैनिक हुतात्मा झाले. पण चिनी राज्यकर्त्यांनी या संघर्षापासून धसका घेऊन भारतविरोधी कारवाया वाढवल्या. सन २०२२च्या नऊ डिसेंबरला भारत-चीन सीमेवरती पूर्व दिशेला यांगत्से पठारावर भारतीय वीरांनी कुणाचाही बळी न देता सीमेचे संरक्षण केले. मधल्या काळात आपण अण्वस्त्रसज्ज झालो. प्रारंभी अग्नी एक हे क्षेपणास्त्र विकसित केले, त्याचा पल्ला बाराशे किलोमीटर्सचा होता. नव्या अग्नी सहाचा पल्ला १२ हजार किलोमीटर आहे. याच दशकांत आपण अंदमान निकोबारला भूदल, नौदल व वायुदल अशा तीनही दलांचे अण्वस्त्रसज्ज संरक्षण केंद्र उभे केले. मलाक्का सामुद्रधुनीच्या वायव्येस अंदमान बेट आहे व चीनला आवश्यक असलेल्या आयात वस्तू ज्या जहाजांमधून हिंदी महासागरातून दक्षिण चीन समुद्रात व पुढे चीनकडे कूच करतात त्यांना मलाक्का सामुद्रधुनी ओलांडावी लागते. आपण या संरक्षक केंद्रामुळे या जहाजांना मज्जाव करू शकतो. अरबी समुद्रात विक्रांत व विक्रमादित्य या विमानवाहू युद्धनौका गस्त घालत आहेत. जुन्या पराभवाचा बदला घ्यायचा हा निर्धार बाळगून आपली रणनीती सतत अत्याधुनिक होत आहे. तीन हजार ४८८ किलोमीटर लांबीची सीमा हिमालयीन क्षेत्रात चीनला भिडली आहे, पण साडेसात हजार किलोमीटर लांबीचा सागरी किनाराही जागरूक निगराणीची प्रतीक्षा करीत आहे. चीनला आसुरी



महत्त्वाकांक्षेने झपाटले आहे. चौदा शेजारी देशांना वर्चस्वाखाली आणायचे व यासाठी भूपृष्ठीय व सागरी मार्गांची जाळी विणायची ही साम्राज्यवादी लालसा चीनला प्रेरणा देत आहे. तेव्हा आपण अखंड सावध असले पाहिजे. गलवान खोऱ्यातील संघर्षामुळे चिनी आव्हान किती भीषण आहे याची जाणीव झाली. या संघर्षात आपण पाय रोवून उभे राहू शकलो कारण आपण अमेरिकेकडून तातडीने अद्ययावत युद्धसाहित्य तसेच तंत्रविज्ञान व शत्रुपक्षाच्या हालचालींची ताजी माहिती मिळवू शकलो. या संघर्षाच्या निमित्ताने उणिवांचीही जाणीव झाली. उदाहरणार्थ, गलवानच्या खोऱ्याचे रक्षण केवळ १५ हजार सैनिकांवर आपण सोपवले होते. आता ते ५० हजारांनी वाढविले आहे. चोवीस तास टेहळणी करणाऱ्या सैनिकांच्या तुकड्या २०२० पूर्वी पाच होत्या, आता १७ आहेत. भारत-चीन सीमेवर सैनिक आणि युद्धवस्तू तातडीने पोहोचवण्याच्या उद्देशाने तीन वर्षांत रस्ते, पूल आणि बोगदे बांधण्यासाठी; या सर्वांची चोख डागडुजी करण्यासाठी ५४ प्रकल्प झाले. हवाई दल सुसज्ज राहण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांचा आकाशतीर प्रकल्प साकारत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उदयनराजे भोसले यांच्यासह 50 जणांविरोधात गुन्हा दाखल!

## बाजार समितीच्या सभापतींची तक्रार

। नाशिक । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सातार्‍यात खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले हे आमने-सामने आल्याने मोठा तणाव निर्माण झाला होता. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत वातावरण शांत केलं. आता या प्रकरणी ५० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खिंडवाडी येथील संभाजीनगरमधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतन इमारत भूमिपूजनप्रसंगी गर्दी जमवणे, दमदाटी आणि मालमत्तेचे नुकसान करणे, काम सुरू करू न देणे आणि जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह सुमारे ५० जणांविरोधात तक्रार देण्यात आली आहे. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत सातारा शहर पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा नोंद झाला नव्हता. अखेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**



पोलिसांनी या प्रकरणी माहिती दिली आहे. खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले या दोघांसह त्यांचे समर्थक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भूमिपूजनावरून आमने-सामने आले होते. या प्रकरणी सातारा बाजार समितीचे सभापती विक्रम पवार यांनी बुधवारी रात्री तक्रार दिली. या प्रकरणी ३५ ओळखीचे आणि १५ अनोळखी व्यक्तींविरोधात तक्रार देण्यात आली. खासदार उदयनराजे भोसले, विनीत पाटील, अजय मोहिते, सनी मुरलीधर भोसले, समीर माने, राहुल गायकवाड, सुभाष मगर, रंजना रावत, किशोर शिंदे, कुणाल चव्हाण, अमोल तांगडे, पंकज चव्हाण, स्वप्नील घुसाळे, नंदकुमार नलवडे, रोहित लाड, युनूस जेंडे, अनिल पिसाळ,काशिनाथ गोरड, संपत महादेव जाधव, शेखर चव्हाण, गितांजली कदम, अश्विनी संतोष गुरव, सौरभ संजीव सुपेकर, प्रवीण धसके, सुनील काटकर, संदेश कुंजीर, सागर गणपत जाधव, गणेश जाधव, पंकज मिसळ, सतीश माने, अर्चना देशमुख, जितेंद्र खानविलकर, सोमनाथ धुमाळ, अभिजित मोहिते यांच्यासह ५० जणांच्या विरोधात ही तक्रार देण्यात आली आहे. सातारा शहर पोलीस ठाण्यात या सर्वांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### काय आहे नेमका वाद?

»सातारा शहरालगत असलेल्या खिंडवाडी येथील संभाजीनगरमधील जागा आहे. ज्याच्यावरून हा वाद सुरू आहे, ही जागा शासनाने आरक्षित करून सातारा कृषी उत्पन्न बाजार समितीला दिली आहे. या जागेचे मूळ मालक हे खासदार उदयनराजे आहेत आणि यामध्ये काही कुळे सुद्धा या आहेत. परंतु ही जागा आरक्षित झाल्यामुळे या जागेवरून वाद सुरू झाला

»हा वाद कोर्टात पोहोचला आणि शिवेंद्रराजे यांच्या म्हणण्यानुसार सुप्रीम कोर्टानेही बाजार समितीसाठीच ही जागा आरक्षित ठेवावी, अशा प्रकारचा आदेश दिला आहे. आणि खासदार उदयनराजे यांच्या म्हणण्यानुसार या जागेवर त्यांचा स्वतःचा हक्क आहे आणि माझ्या जागेमध्ये काय करायचे हे मी ठरवणार अशी उदयनराजेंची भूमिका आहे.

---

## पुढचा आठवडा अत्यंत महत्त्वाचा, धो-धो बरसणार, मान्सूनबाबत मोठी अपडेट

। मुंबई । महाईन्यूज



मुंबईमध्ये यंदा मान्सूनपूर्व पावसाचा अनुभव नव्हता. मुंबई शहरामध्ये १ जूनपासून २१.१ तर उपनगरांमध्ये १७.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. प्रत्यक्षात जूनच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत शहरामध्ये एकूण ३३१.६ आणि उपनगरांमध्ये एकूण ३२७.२ मिलीमीटर पडतो. मात्र, येत्या आठवड्यात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असल्याने मुंबईमध्ये पुढचा आठवडा पावसाळी अनुभवाचा असेल असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे.

मोठ्या खंडानंतर मान्सूनचे पुनरागमन होताना मुंबईकरांना पावसाच्या माऱ्यासाठी तयार राहण्याची सूचना देणारा एक संदेश सोशल मीडियावर या काळात प्रसारित झाला आहे. तीन ते चार दिवसांमध्ये जूनच्या पावसाचा सरासरी आकडा गाठला जाईल इतका पाऊस या काळात पडेल, असा इशाराही देण्यात आला आहे. २६ जूननंतर अती मुसळधार म्हणजे ११५ ते २०४ मिलीमीटर दरम्यान पाऊस पडू शकेल असाही इशारा देण्यात आला आहे.यासंदर्भात प्रादेशिक हवामान विभागाच्या अधिकारी सुषमा नायर यांनी मुंबईमध्ये घाबरून जाण्याइतका पाऊस पडेल अशी शक्यता बुधवारी २१ जूनला तरी दिसत नसल्याचे स्पष्ट केले.

---

## मंत्रालयातील फाइलला पाय फुटले? महत्वाचे डॉक्यूमेंट असलेली फाइल गायब

### » मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मंत्रालयात असलेल्या चित्रीकरण स्टुडिओच्या उभारणीसंदर्भातील ही फाइल असून सरकारी अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून या प्रकरणी मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सरकारी कार्यालयांमधून शासकीय कागदपत्रे गहाळ होण्याचे प्रकार अधूनमधून घडतात. मात्र, आता सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या मंत्रालयातूनच फाइल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. मंत्रालयात असलेल्या चित्रीकरण स्टुडिओच्या उभारणीसंदर्भातील ही फाइल असून सरकारी अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून या प्रकरणी मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्य सरकारने घेतलेले निर्णय, वेगवेगळ्या योजना, खरेदी-विक्री, निविदाप्रक्रिया या सर्वांचे दस्तऐवज मंत्रालयात जतन करून ठेवले जातात. त्या त्या विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर हे दस्ताऐवज सांभाळण्याची जबाबदारी असते. शासनाच्या विविध योजनांची प्रसिद्ध देण्यासाठी चित्रफिती तयार करणे आणि मंत्री, सनदी अधिकाऱ्यांच्या मुलाखती




चित्रित करण्यासाठी मंत्रालयाच्या तळमजल्यावर चित्रीकरण स्टुडिओ तयार करण्यात आला. या स्टुडिओच्या उभारण्यासाठी शासनाची मान्यता मिळविण्यात आली. स्टुडिओ अद्ययावत करण्यासाठी निविदाप्रक्रिया काढण्यात आली. स्टुडिओला मंजुरी मिळण्यापासून ते उभारणीपर्यंत सर्व इत्थ्यंभूत माहिती मंत्रालयातील माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय कार्यालयात ठेवण्यात आली होती.

# राखी नडली, शर्लिननं थेट जेलमध्ये धाडली

बॉलीवूडची ड्रामा क्वीन राखी सावंतला आता मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. तिचा आणि शर्लिनमधील वाद टोकाला गेला आहे. शर्लिननं तर काहीही झालं तरी आपण तिला सोडणार नाही. असा पवित्रा घेतला आहे. या दोन्ही सेलिब्रेटींच्या भांडणाचे नेमके कारण नेमकं आहे तरी काय...

राखीच्या विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर शर्लिननं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पोलिसांना एक पत्र लिहिले आहे. त्यामध्ये शर्लिननं साजिद खानच्या विरोधात विनयभंगाचे जे आरोप केले होते त्याचा उल्लेख केला आहे. अद्याप त्या प्रकरणाची कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. असेही शर्लिननं म्हटलं आहे.

दुसरीकडे राखी सावंतनं गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये शर्लिनच्या विरोधात मुंबईतील ओशिवरा पोलीस ठाण्यामध्ये बदनामी केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. सध्या राखी ही पोलीस कोठडीमध्ये असून आता राखी आणि शर्लिनची भांडणं किती दिवस चालणार हा त्यांच्या चाहत्यांसाठी कुतूहलाचा विषय आहे.



प्रकरण आहे तरी काय...

बिग बॉसचा १६ सीझन सुरु झाला तसे त्या शो मधील प्रसिद्ध स्पर्धक साजिद खानवर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप शर्लिन चोप्रानं केले होते. काही झालं तरी त्या शो मध्ये साजिदला घेऊ नका. अशी भूमिका शर्लिनची होती. ज्या माणसानं महिलांचे शोषण केले आहे, त्यांच्याशी गैरवर्तन केले आहे त्याला माफी नाही. त्याला बिग बॉसमधून बाहेर काढण्यात यावे. असे शर्लिनचे म्हणणे होते.

# नटसम्राटमध्ये दिसले असते अमिताभ बच्चन, त्यांनी होकारही कळवला होता

महानायक अमिताभ बच्चन यांची भूमिका असलेला 'एबी आणि सीडी' हा मराठी चित्रपट दोन वर्षांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आल. १३ मार्चला हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आणि त्यानंतर १६ मार्चला करोनामुळं थिएटर्स बंद झाली. पण तुम्हाला माहिती आहे का की, नाना पाटेकरांच्या नटसम्राट या चित्रपटात भूमिका साकारण्यासाठी बिग बी यांनी होकार दिला होता.



]वि. वा. शिरवाडकर यांच्या लेखणीतून साकारलेलं 'नटसम्राट' हे अजरामर नाटक. यावर आधारित चित्रपटानंही प्रेक्षकांची मनं जिंकली. मराठी रंगभूमीवरील श्रीराम लागू, दत्ता भट, यशवंत दत्त, सतीश दुभाषी, चंद्रकांत गोखले, राजा गोसावी, मधुसूदन कोल्हटकर या दिग्गजांच्या दमदार अभिनयानं अजरामर केलेलं 'नटसम्राट' हे नाटक १ जानेवारी २०१६ रोजी सिनेमाच्या रुपात ७० एमएमच्या पडद्यावर झळकलं. महेश मांजरेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात अभिनेते नाना पाटेकर यांनी आप्पासाहेब बेलवलकरांची प्रमुख भूमिका साकारली आहे. बॉलिवूडचे सम्राट अमिताभ बच्चन यांना घेऊन 'नटसम्राट' हिंदीत करायची निर्माता-दिग्दर्शक महेश मांजरेकरांची इच्छा बऱ्याच जणांना माहीत असेल. पण, नाना पाटेकरांच्या 'नटसम्राट'मध्ये भूमिका करण्यासही बिग बी यांनी होकार दिला होता. होय, हे खरंय. अर्थात, महानायकाच्या मराठीतील पदार्पणाचा हा योग जुळून आला नाही.

# गायक हनी सिंगला जीवे मारण्याची धमकी

प्रसिद्ध पंजाबी गायक आणि रॅपर हनी सिंगबद्दल एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. हनी सिंगला गँगस्टर गोल्डी ब्रारकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. गोल्डीने हनी सिंगला धमकीची व्हॉईस नोट पाठवली आहे. धमकी मिळाल्यानंतर हनी सिंगने दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलमध्ये याबाबत तक्रार केली आहे. पोलिसांना दिलेल्या तक्रारीत हनी सिंहने सांगितले की, “कॅनडातील गोल्डी ब्रार या गुंडाने मला व्हॉईस नोट पाठवली आहे. ज्यामध्ये त्याने मला जीवे



मारण्याची धमकी दिली आहे.” हनी सिंगने ती व्हॉइस नोट पोलिसांना दिली आहे. दुसरीकडे, हनी सिंगच्या तक्रारीवरून पोलिसांनी तातडीने या प्रकरणाचा तपास सुरू केला. पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला यांच्या हत्येप्रकरणी गोल्डी ब्रारचे नाव समोर आले होते. गोल्डीने लॉरेन्स बिश्नोई सारख्या गुंडांबरोबर मिळून सिद्धूच्या हत्येचा कट रचला होता. सध्या गोल्डी ब्रार कॅनडामध्ये आहे. ज्यांच्या विरोधात NIA ने UAPA अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हनी सिंगच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाले तर, हनी सिंगने काही काळापूर्वीच इंडस्ट्रीत पुनरागमन केले आहे. नैराश्यामुळे हनीने स्वत:ला कामापासून खूप दिवसांपासून दूर ठेवले होते. हनीने २००५ मध्ये संगीत निर्माता म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. त्यानंतर अनेक हिट गाणी आणि रॅप्सने इंडस्ट्रीला ओळख करून देणारा हनी अचानक ड्रग्सच्या आहारी गेला होता. नंतर बायपोलर डिसऑर्डरचा बळी झाला.



# अगदी बिग बींसारखंच नव्याचीही आहे अगदी शुद्ध भाषा, तिच्या हिंदीच्या प्रेमात पडले चाहते

मुंबई- अमिताभ बच्चन यांची नात नव्या नवेली नंदा चR सोशल मीडियावर प्रचंड क्रेझ आहे. नव्याने बॉलिवूडमध्ये प्रवेश केलेला नाही, तरीही ती चाहत्यांची आवडती आहे. नव्या एक व्यावसायिका असून ती महिलांच्या सशक्तीकरणासाठी काम करते. यासोबतच नव्याचे पॉडकास्टही आहे. आता नव्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे ज्यामध्ये ती अस्खलित हिंदीत बोलत आहे. व्हिडिओमध्ये नव्या हिंदीसोबतच तिच्या विचारांनी लोकांना प्रभावित करत आहे.

## नक्की काय म्हणाली नव्या

नव्या व्हिडिओमध्ये म्हणते की, 'एक गोष्ट मी पुन्हा पुन्हा ऐकते ती म्हणजे तू खूप लहान आहेस. तुला अनुभव नाही. सतत एक प्रश्न विचारला जातो की, अरे तू तर फक्त २५ वर्षांची आहेस, तुला जीवनाचा अनुभव तरी काय आहे? तर तू आरोग्यसेवा, कायदेशीर जागरूकता, घरगुती हिंसाचार या गोष्टींवर कसं काय काम करू शकते.' नव्या पुढे म्हणते की,'मी नेहमी विचार करतो की मी ८० वर्षांची होईपर्यंत थांबले तर जगाचे काय होईल? आपल्या देशातील किमान ८० टक्के लोक २० ते ३० वर्षे वयोगटातील आहेत. आपण सर्वजण ५० वर्षे काहीतरी करण्यासाठी थांबलो तर या पिढीचे काय होईल? बदल कोण आणणार?

मला असं वाटतं की मुलांची ही नवी पिढी आहे. एवढ्या लहान वयात त्यांना खूप ज्ञान आहे.

# भारत-पाकिस्तान सामन्यात जोरदार राडा!

## खेळाडू प्रशिक्षकाला भिडले; व्हिडिओ चांगलाच व्हायरल

। बंगळुरु ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशा निराशेच्या हिंदोळ्यावर रंगलेल्या इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिल्या कसोटीचा शेवटही रंजक झाला. हा सामान कोण जिंकेल हे कोणालाही सांगता येत नव्हते. पावसाने पहिल्या सत्रात खेळत होऊ दिला नव्हता. पण तरीही ऑस्ट्रेलियाने हार मानली नाही आणि उस्मान ख्वाजाने संघाला विजयाचे स्वप्न दाखवले.**



भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना सुरु असताना जोरदार राडा झाला. भारताचे प्रशिक्षक आणि पाकिस्तानचे खेळाडू यांच्यामध्ये हा राडा झाल्याचे झाल्याचे पाहायला मिळाले. या गोष्टीचा व्हिडिओ सध्याच्या घडीला चांगलाच व्हायरल झाला आहे. भारताने या सामन्यात सुरुवातीच्या १५ मिनिटांमध्येच गोल केले होते. मध्यंतरापर्यंत भारताने या सामन्यात २-० अशी आघाडीही घेतली होती. पण तरीही भारताचे प्रशिक्षक इगोर स्तिमॅक यावेळी भडकल्याचे पाहायला मिळाले. हा सामना सुरु असताना फुटबॉल टच लाईनच्या बाहेर गेला त्यामुळे पाकिस्तानला थ्रो करण्याची संधी मिळाली. त्यामुळे पाकिस्तानचा खेळाडू हा चेंडू मैदानात टाकण्यासाठी सज्ज झाला होता. पण त्यावेळी भारताचे प्रशिक्षक भडकले. कारण ही गोष्ट घडत असताना भारताच्या खेळाडूविरोधात फाऊल झाले होते. पण पंचांनी मात्र त्याची दखल घेतली नव्हती. त्यामुळे स्तिमॅक यांना राग आला आणि त्यानंतर ते पाकिस्तानच्या खेळाडूकडे गेले. पाकिस्तानचा खेळाडू हा चेंडू मैदानात टाकण्याच्या तयारीत होता. त्यावेळी स्तिमॅक यांनी तो चेंडू उडवला आणि त्यानंतर राडा सुरु झाला. यानंतर पाकिस्तानचे खेळाडू भारताच्या प्रशिक्षकाच्या अंगावर धावून गेले. त्यानंतर पंच धावत त्या ठिकाणी गेले आणि त्यांना सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. भारताच्या काही खेळाडूंनीही यावेळी मध्यस्थी केली आणि हा प्रकार निवळला. पण या सर्व प्रकारानंतर भारताचे प्रशिक्षक स्तिमॅक यांना मात्र रेड कार्ड दाखवण्यात आले.

## भारताच्या एचएस प्रणॉय आणि परुपल्ली कश्यप यांचे तैवान बॅडमिंटन स्पर्धेत दमदार विजय

। तैपई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



एचएस प्रणॉय, अनुभवी परुपल्ली कश्यप यांनी बुधवारी तैवान ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. यातही विशेष म्हणजे या दोघांनीही आपापल्या लढती सहज आणि कमी वेळात जिंकल्या. जागतिक रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रणॉयने अवघ्या २६ मिनिटांत यजमान तैवानच्या लिन यू सीन याला २१-११, २१-१० असे हरवून विजयी सलामी दिली. प्रणॉयने या सामन्यात आक्रमक खेळ केल्याचे पाहायला मिळाले. कारण प्रणॉयने पहिल्याच गेममध्ये दमदार आघाडी घेतली होती. त्यावेळी तो हा गेम सहज जिंकेल, असे वाटले होते. पहिला गेम जिंकल्यावर त्याचे मनोबल चांगलेच उंचावलेले पाहायला मिळाले. या गोष्टीचा फायदा त्याला दुसऱ्या गेममध्ये झाला. दुसऱ्या गेममध्ये त्याने अधिक आक्रमक खेळ केला आणि सुरुवातीला चांगली आघाडी घेतली होती. ही आघाडी त्याने शेवटपर्यंत कायम ठेवली आणि दुसऱ्या गेमसह सामनाही जिंकला. या सुपर ३००च्या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत प्रणॉयचा सामना होईल तो इंडोनेशियाच्या टॉमी सुगीयार्तो याच्याशी. माजी राष्ट्रकुलविजेत्या परुपल्ली कश्यपने जर्मनीच्या सॅम्युएल सियाओचा २१-१५, २१-१६ असा फडशा पाडला. कश्यपला दुसऱ्या फेरीत इंडोनेशियाच्या सू लि यांगशी दोन हात करावे लागतील.

### मिथुनचा कडवा प्रतिकार

भारताचा राष्ट्रीय विजेता मिथुन मंजूनाथचा पराभव झाला; पण त्याने आपल्या खेळाने मने जिंकली. मिथुनला दुसऱ्या सीडेड चो तिएन चेन (तैवान) याचे आव्हान १८-२१, २१-१४, १६-२१ असे मोडून काढले. मिथुनने चेनला एक तास, ११ मिनिटे झुंजविले.

महिला एकेरीत तान्या हेमंतने विजयी सलामी दिली. तिने हंगेरीच्या अग्नेस कोरोसीला २१-७, २१-१७ असे नमवले. मात्र पुढील फेरीत तिला आव्हान असेल ते अव्वल सीडेड तैइ झ्यू यिंग हिचे. तैइ ही जागतिक स्पर्धा आणि ऑलिम्पिकमधील उपविजेती आहे. मिश्र दुहेरीत सिक्की रेड्डी आणि रोहन कपूर यांनी भारताच्याच नवनीत बोक्का-प्रिया कोनजेंगबम यांच्यावर २१-१४, २१-१७ अशी मात केली.

# माजी मरीन कमांडो रवी कुलकर्णी दांपत्याची पाण्याखाली योगाची प्रात्यक्षिके!

## आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य तेरा फूट पाण्याखाली 22 मिनिटे योग

। उरण (नवी मुंबई) ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून उरण मधील माजी मरीन कमांडो रवी कुलकर्णी आणि त्यांची पत्नी योगप्रशिक्षिका विदुला यांनी तेरा फूट पाण्याखाली २२ मिनिटे योगासनाची प्रात्यक्षिके सादर केली. पाण्याखालील अशा प्रकारची प्रात्यक्षिके हा देशातील बहुतेक पहिलाच विक्रम असावा, असे रवी कुलकर्णी यांनी प्रात्यक्षिके यशस्वी पार पडल्यानंतर सांगितले. येथील श्री बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलातील स्विमिंग पूल मध्ये शेकडो योगप्रेमींनी हा थरार अनुभवला.**



पाणबुड्यासाठी लागणाऱ्या डायव्हिंग साहित्याचा अचूक वापर करून या दांपत्याने पाण्याखाली दाखवलेल्या योगाच्या प्रात्यक्षिकांमुळे उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. ओंकार, प्रार्थना आणि सूर्यनमस्कारांनी प्रारंभ करून कुलकर्णी दांपत्याने या प्रात्यक्षिकांना सुरुवात केली. प्रत्यक्षात, ड्रायव्हिंग इक्विपमेंट मुळे पाण्याखाली स्थिर राहणे बऱ्यापैकी अवघड जात होते. पण, या कुलकर्णी दांपत्याने गेले काही दिवस निष्ठेने आणि चिकाटीने सराव केल्यामुळे त्यांनी पाण्याखाली स्थिर राहून आपले लक्ष्य साध्य केले. त्यांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांमध्ये पर्वतासन, त्रिकोणासन, वीरभद्रासन, वृक्षासन, नटराजासन, देवीची पोझ या उभ्याने करण्याच्या आसनांचा समावेश होता. त्याचप्रमाणे बसून किंवा विशिष्ट पोझ मध्ये करण्याच्या पर्वतासन, सिंहासन, भुजंगासन, शलभासान, पद्मासन या आसनांची देखील त्यांनी प्रात्यक्षिके दाखवली. त्यानंतर पाण्याखाली मेडिटेशन करून तसेच ओंकार आणि श्लोक म्हणून त्यांनी प्रात्यक्षिकांची यशस्वी सांगता केली.

### योगासनाची अफलातून प्रात्यक्षिके

तेरा फूट पाण्याखाली तब्बल २२ ते २५ मिनिटे योगाची ही प्रात्यक्षिके झाली. त्यानंतर त्यांनी वर घेऊन सगळ्यांना अभिवादन केले. योगदिना चे औचित्य साधून ही अनोखी प्रात्यक्षिके सादर केल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. या प्रात्यक्षिकांदरम्यान त्यांना माजी मरीन कमांडो विनोद कुमार, आणि राम सवार पाल यांचे सहकार्य मिळाले. प्रीतम पाटील यांनीही मोठे साहाय्य केले. माजी मरीन कमांडो रवी कुलकर्णी यांनी पाण्याखाली अद्भूत, अनोखे आणि जगाविरहित विक्रम नोंदवण्याची परंपरा कायम ठेवली. त्यांचा हा तिसरा विक्रम नोंदवला गेला. यापूर्वी त्यांनी २००३ मध्ये " पाण्याखालचा लग्न सोहळा "आयोजित करून विश्व विक्रम साजरा केला होता. गेल्या वर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दि.१५ ऑगस्ट रोजी सहा जणांच्या साथीने पाण्याखाली संचलन, ध्वजवंदन आणि राष्ट्रगीत गाऊन हे जागतिक विक्रम केला होता. आणि आता योगदिनाचे औचित्य साधून तेरा फूट पाण्याखाली २२ मिनिटे योगासनाची अफलातून प्रात्यक्षिके सादर केली.